नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था,
विशेष वर्गवारीतील पतसंस्था नोंदणी निकष,
तसेच कार्यक्षेत्रवाढ व शाखा विस्ताराबाबतचे
सुधारित निकष

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय**
**जा.क्र.पतसंस्था/स.आ.५/पतसंस्था/नोंदणी/निकष/२०१९/ ५७०**
**दिनांक :- ०८/०३/२०१९**

**-:- परिपत्रक -:-**

**प्रस्तावना:-**

पतसंस्थांतील आर्थिक अडचणीचा विचार करून दि.३/२/२०१४ रोजी या कार्यालयाने पतसंस्थांची नोंदणी, कार्यक्षेत्र वाढ व शाखाविस्तार याबाबत परिपत्रक निर्गमीत केले होते. सदर परिपत्रकातील निकष अस्तित्वात आल्यानंतर पतसंस्थांचे नोंदणीचे प्रमाण कमी झाले. सक्षम पतसंस्था ज्यांना त्यांच्या व्यवसायाची वृध्दी करावयाची आहे त्यांनाही या निकषामुळे कार्यक्षेत्र वाढ अथवा शाखा विस्तार करता येवू शकला नाही तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मुंबई तसेच इतर फेडरशेन यांनी सदरचे निकष शिथिल करणेबाबत वारंवार या कार्यालयास व शासनास मागणी केली आहे. त्यानुसार सहकार चळवळीचे निकोप वाढीसाठी व सक्षम पतसंस्थांच्या व्यवसाय वृध्दीसाठी सदरचे निकष काही प्रमाणात शिथिल करणेबाबत शासन स्तरावर बैठक होऊन जा.क्र. बैठक -०२१९/ प्र. क्र.१८/ ७-स दि.७/३/२०१९ रोजी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार पतसंस्था नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व शाखा विस्तार याबाबतचे सुधारीत निकष खालीलप्रमाणे निर्गमीत करण्यात येत आहेत.

**अ) <u>सर्वसाधारण नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणी निकष</u> :-**

| अ. क्र. | विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | प्राथमिक सभासद संख्या | नोंदणी समयी भाग भांडवल रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | अ)बृहन्मुंबई व नवी मुंबई | शहर (महानगरपालिका कार्यक्षेत्र)/जिल्हा | ४००० | रु.७५ लाख |
| | | एक वॉर्ड / प्रभाग | २५०० | रु.४० लाख |
| | ब)ठाणे | ठाणे शहर (महानगरपालिका कार्यक्षेत्र) /जिल्हा | ४००० | रु.७५ लाख |
| | | एक वॉर्ड / प्रभाग | २५०० | रु.४० लाख |
| | क)पुणे | पुणे शहर (महानगरपालिका कार्यक्षेत्र) / जिल्हा | ३००० | रु.६० लाख |
| | ड)नागपूर | नागपूर शहर (महानगरपालिका कार्यक्षेत्र) /जिल्हा | ३००० | रु.६० लाख |
| | इ)नाशिक | नाशिक शहर (महानगरपालिका | ३००० | रु.६० लाख |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यक्षेत्र) / जिल्हा | | |
| | ई) इतर महानगर पालिका कार्यक्षेत्र साठी (मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक वगळून) | मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक वगळून इतर महानगरपालिका | २५०० | रु.४० लाख |
| | | एक वॉर्ड / प्रभाग | २२०० | रु. ३५ लाख |
| २) | अन्य नागरी व ग्रामीण बिगरशेती (चंद्रपूर , गोंदिया व गडचिरोली वगळता) | गाव | ७०० | रु.३ लाख |
| ३) | तालुका(चंद्रपूर , गोंदिया व गडचिरोली वगळता) | तालुका | २२०० | रु.१२ लाख |
| ४) | चंद्रपूर , गोंदिया व गडचिरोली | जिल्हा | १५०० | रु.१५ लाख |
| | | तालुका | ७०० | रु.३ लाख |
| | | गाव | ३०० | रु.१ लाख |
| ५) | उर्वरित जिल्हे | जिल्हा | २२०० | रु.३५ लाख |
| ६) | नगरपालिका असलेली शहरे | नगरपालिका कार्यक्षेत्रासाठी | २२०० | रु. २० लाख |
| | | एक वॉर्ड / प्रभाग | १५०० | रु.१५ लाख |

**नियोजित पतसंस्था नोंदणीबाबत वरील निकष पूर्ततेबरोबर खालील बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.:-**

१) संस्था वाढीबाबत आगामी तीन वर्षाचा प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

**(रक्कम रुपये लाखात)**

| **प्रस्तावित कार्यक्षेत्र** | **अपेक्षित ठेव वाढ** | | | **अपेक्षित कर्ज वाढ** | | | **अपेक्षित वसुल भाग भांडवल वाढ** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **१ ले वर्ष** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** | **१ ले वर्ष** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** | **१ ले वर्ष** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

| **प्रस्तावित कार्यक्षेत्र** | **अपेक्षित सभासद संख्या वाढ** | | | **अपेक्षित राखीव व इतर निधी** | | | **अपेक्षित नफा/तोटा** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **१ ले वर्ष** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** | **१ ले वर्ष** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** | **१ ले वर्ष** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** |
| 1 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| | | | | | | | | | |

२) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांचे गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत संबंधित कार्यक्षेत्रातील पोलिस स्टेशनमधील जबाबदार अधिकाऱ्याकडून अद्यावत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांनी मा.कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर खालील मुद्दे समाविष्ठ असलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

अ) मुख्य प्रवर्तक, इतर प्रवर्तक व समाविष्ट प्रवर्तक सभासद यांचे आपला ग्राहक जाणा (Know Your Customer) बाबत १००% पूर्तता केली आहे.

ब) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक हे सावकारी (Money Lending) किंवा तत्सम प्रकारचा कोणताही व्यवसाय करीत नाहीत.

क) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक हे कोणत्याही सहकारी संस्थेचे थकबाकीदार नाहीत.

ड) मुख्य प्रवर्तक व इतर १० प्रवर्तक हे समान उद्देश असलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या इतर सहकारी संस्थेचे संचालक नाहीत.

इ) संस्थेचे ठेवी व कर्ज व्याजदराचे धोरण हे सहकार खात्याने वेळोवेळी निर्देशित केलेल्या निकषांशी विसंगत व अवास्तव स्पर्धा करणारे असणार नाहीत.

४) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांनी नियोजित संस्थेमध्ये गाव पातळीवरील संस्थेबाबत किमान २५,००० प्रत्येकी व इतर पातळीवरील म्हणजे जिल्हा, तालुका किंवा एक वॉर्ड/ प्रभाग पातळीवरील संस्थेबाबत किमान ५०,०००/- प्रत्येकी ठेव ५ वर्षाकरीता संस्थेमध्ये ठेवण्याची हमी दंडाधिकारी यांचे समोरील प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक राहील.

५) प्रस्तावित कार्यक्षेत्रातील लोकसंख्या दाखला सक्षम अधिकाऱ्याकडून सादर करावा.

६) नियोजित संस्थांची नोंदणी करण्यापूर्वी संबंधित निबंधकांनी सदर नियोजित पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांची सुनावणी घेऊन गुणवत्तेनूसार नोंदणी विषयक निर्णय घ्यावा.

७) नियोजित पतसंस्था नोंदणी करताना मुख्य प्रवर्तक / प्रवर्तकापैकी कोणीही यापूर्वी गैरकारभारामुळे जिल्हयातील अडचणीत आलेल्या, बंद पडलेल्या, अवसायनात असलेल्या संस्थांचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी नाहीत याची संबंधित निबंधक यांनी खात्री करावी.

८) वरील निकषांची पूर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थांची नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषांची पूर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

**ब) विशेष वर्गवारीतील नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत निकष :-**

विशेष वर्गवारीतील नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीबाबत सुधारित निकष पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | विशेष वर्गवारी | कार्यक्षेत्र | प्राथमिक सभासद संख्या | नोंदणी समयी भाग भांडवल रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | आदिवासी | गाव | ३५० | रु.१ लाख |
| | | तालुका | ७०० | रु.३ लाख |
| | | जिल्हा | १५०० | रु.७ लाख |
| २) | मागासवर्गीय | वॉर्ड/प्रभाग (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | ११०० | रु.१८ लाख |
| | | वॉर्ड/प्रभाग (उर्वरित महानगरपालिका) | ७०० | रु.७ लाख |
| | | महानगरपालिका (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | ३००० | रु.४० लाख |
| | | उर्वरित महानगरपालिका कार्यक्षेत्र | २००० | रु.३० लाख |
| | | नगरपालिका | ७०० | रु.५ लाख |
| | | गाव | ३५० | रु.२ लाख |
| | | तालुका | १५०० | रु.७ लाख |
| | | जिल्हा | २२०० | रु.१५ लाख |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | महिला | वॉर्ड/प्रभाग (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | १००० | रु.१५ लाख |
| | | वॉर्ड/प्रभाग (उर्वरित महानगरपालिका) | ८०० | रु.१० लाख |
| | | महानगरपालिका (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | २००० | रु.३० लाख |
| | | उर्वरित महानगरपालिका कार्यक्षेत्र | १५०० | रु.२० लाख |
| | | नगरपालिका | ५०० | रु.५ लाख |
| | | गाव | २५० | रु.१.५० लाख |
| | | तालुका | ५०० | रु.५ लाख |
| | | जिल्हा | १५०० | रु.१० लाख |
| ४) | माजी सैनिक | वॉर्ड (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | ३५० | रु.२२ लाख |
| | | वॉर्ड (उर्वरित महानगरपालिका) | ३५० | रु.१५ लाख |
| | | नगरपालिका | २०० | रु.७ लाख |
| | | गाव | २०० | रु. ३.५० लाख |
| | | तालुका | ३५० | रु.११ लाख |
| | | जिल्हा | १५०० | रु.३० लाख |

**विशेष वर्गवारीतील नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीबाबत खालील बाबींची प्रामुख्याने नोंद घेण्यात यावी. :-**

अ) आदिवासी नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीकामी कमीत कमी ७५% सभासद आदिवासी असणे अनिवार्य राहील.

ब) मागासवर्गीय नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीकामी कमीत कमी ७५% सभासद मागासवर्गीय असणे अनिवार्य राहील.

क) महिला नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणी कामी कमीत कमी ७५% सभासद महिला असणे अनिवार्य राहील.

ड) माजी सैनिक नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीकामी १००% सभासद माजी सैनिक असणे अनिवार्य राहील.

इ) आदिवासी,मागासवर्गीय,महिला नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थाबाबत २५% इतर प्रवर्तक सभासद असतील असे असले तरी अशा इतर सभासदांना संचालक म्हणून प्रतिनिधीत्व असणार नाही. अशी तरतूद उपविधी मंजूर करताना संबंधित निबंधकांनी करुन घेणेबाबत दक्षता घ्यावी.

**विशेष वर्गवारीतील नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीबाबत वरील निकष पूर्ततेबरोबर खालील बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.**

१) संस्था वाढीबाबत आगामी तीन वर्षाचा प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

**(रक्कम रुपये लाखात)**

| प्रस्तावित कार्यक्षेत्र | अपेक्षित ठेव वाढ | | | अपेक्षित कर्ज वाढ | | | अपेक्षित वसुल भाग भांडवल वाढ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

| प्रस्तावित कार्यक्षेत्र | अपेक्षित सभासद संख्या वाढ | | | अपेक्षित राखीव व इतर निधी | | | अपेक्षित नफा/तोटा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष |
| 1 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| | | | | | | | | | |

२) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांचे गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत संबंधित कार्यक्षेत्रातील पोलिस स्टेशनमधील जबाबदार अधिकाऱ्याकडून अद्यावत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांनी मा.कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर खालील मुद्दे समाविष्ठ असलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

अ) मुख्य प्रवर्तक, इतर प्रवर्तक व समाविष्ट प्रवर्तक सभासद यांचे आपला ग्राहक जाणा (Know Your Customer) बाबत १००% पूर्तता केली आहे.

ब) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक हे सावकारी (Money Lending) किंवा तत्सम प्रकारचा कोणताही व्यवसाय करीत नाहीत.

क) मुख्य प्रवर्तक व इतक प्रवर्तक हे कोणत्याही सहकारी संस्थेचे थकबाकीदार नाहीत.

ड) मुख्य प्रवर्तक व इतर १० प्रवर्तक हे समान उद्देश असलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या इतर सहकारी संस्थेचे संचालक नाहीत.

इ) संस्थेचे ठेवी व कर्ज व्याजदराचे धोरण हे सहकार खात्याने वेळोवेळी निर्देशित केलेल्या निकषांशी विसंगत व अवास्तव स्पर्धा करणारे असणार नाहीत.

४) प्रस्तावित कार्यक्षेत्रातील लोकसंख्येचा दाखला सक्षम अधिकाऱ्याकडून सादर करावा.

५) नियोजित संस्थांची नोंदणी करण्यापूर्वी संबंधित निबंधकांनी सदर नियोजित पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या त्याच वर्गीकरणातील पतसंस्थांची सुनावणी घेऊन गुणवत्तेनूसार नोंदणी विषयक निर्णय घ्यावा.

६) नियोजित पतसंस्था नोंदणी करताना मुख्य प्रवर्तक/प्रवर्तकापैकी कोणीही यापूर्वी गैरकारभारामुळे जिल्हयातील अडचणीत आलेल्या, बंद पडलेल्या, अवसायनात असलेल्या संस्थांचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी नाहीत याची संबंधित निबंधक यांनी खात्री करावी.

७) वरील निकषांची पूर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थांची नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषांची पूर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

**क) <u>नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था कार्यक्षेत्रवाढीबाबतचे निकष:-</u>**

| अ. क्र. | प्रस्तावित कार्यक्षेत्रासाठी निकष | बृहन्मुंबई | तालुका | जिल्हा/ शेजारील जिल्हा | विभाग/ शेजारील विभाग | एकापेक्षा अधिक विभाग/ राज्यस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लेखापरिक्षण वर्गवारी | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा | मागील तीन वर्ष **अ** वर्ग असावा | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा |
| २ | ठेवी (लगतचे आर्थिक | ६५ कोटी | ४ कोटी २५ लाख | १२ कोटी ५० लाख | ४२ कोटी | ८५ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ष) | | | | | |
| ३ | ढोबळ अनुत्पादक जिंदगी (Gross NPA) (लगतचे आर्थिक वर्ष) | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी |
| ४ | थकबाकीचे प्रमाण (लगतचे आर्थिक वर्ष) | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी |
| ५ | सी.डी.रेशो (लगतचे आर्थिक वर्ष) | ६० ते ७०% | ६० ते ७०% | ६० ते ७०% | ६० ते ७० % | ६० ते ७० % |
| ६ | स्वनिधी(वसूल भा.भां. +राखीव निधी+ इमारत निधी - संचित तोटे) (लगतचे आर्थिक वर्ष) | ६ कोटी ५० लाख | ४० लाख | १ कोटी २५ लाख | ४ कोटी २५ लाख | ८ कोटी ५० लाख |
| ७ | नफा | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी |
| ८ | निव्वळ नफयाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण (लगतचे आर्थिक वर्ष) | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे |
| ९ | संगणकीकरण | १००% पुर्तता | १००% पुर्तता | १००% पुर्तता | १००% CBS सह पुर्तता | १००% CBS सह पुर्तता |

१) कार्यक्षेत्रवाढीबाबतचे संस्थांचे प्रस्ताव विचारात घेताना गावपातळीवरील संस्थेस तालुका कार्यक्षेत्रवाढ, तालुका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेस जिल्हा कार्यक्षेत्रवाढ देता येईल. गाव पातळीवरील संस्थेस थेट जिल्हा कार्यक्षेत्रवाढ किंवा तालुका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेस थेट विभागाचे कार्यक्षेत्र देता येणार नाही.

२) मात्र जिल्हा कार्यक्षेत्र असणाऱ्या पतसंस्था वरील निकषांची पूर्तता करीत असतील तर त्यांना विभागाचे किंवा शेजारील जिल्हा किंवा एकापेक्षा अधिक विभागाचे कार्यक्षेत्र देता येईल.

३) कार्यक्षेत्रवाढीस **सहकार आयुक्त कार्यालयाची पूर्व मंजूरी घेणे बंधनकारक राहील.** तसेच असे प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे पूर्व मंजूरीसाठी पाठविणेत येणार असल्याने प्रस्ताव परिपूर्ण व निकषांची पूर्तता करीत असल्याच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पाठवावेत.

४) जिल्हा कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्ताव तालुका उप/सहाय्यक निबंधक यांचेमार्फत, विभाग किंवा शेजारील जिल्हा कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक यांच्या मार्फत तर एकापेक्षा अधिक विभागाचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे मार्फत सादर केले जातील.

५) संस्थेने लगतचे आर्थिक वर्षात दैनिक पध्दतीवर रोख राखीव निधी (C R R) व वैधानिक तरलता निधी (S L R) यांचे उल्लंघन झाले आहे किंवा कसे ? झाले असल्यास किती वेळा, याबाबतचा वैधानिक लेखापरिक्षक यांचा दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

६) संस्थेने राखीव निधी व इतर निधीची गुंतवणुक कायदयातील तरतूदीनुसार केली आहे किंवा कसे याबाबतची खात्री संबंधित निबंधकाने करावयाची आहे.

७) संस्थेने उपविधीतील कर्ज प्रकारनिहाय मर्यादेचे उल्लंघन केलेले नसावे याची खात्री संबंधीत निबंधकाने करावयाची आहे.

८) संस्थेचे चेअरमन यांनी कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोरील खालील मुद्दे समाविष्ठ असलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

I) संस्थेचे सर्व विद्यमान सभासद व ग्राहकासाठी आपला ग्राहक जाणा (KYC) ची १००% पूर्तता केली आहे.

II) संस्थेच्या मुख्यालयासह सर्व शाखाचे काम संगणकीकृत केलेले असून, कार्यरत असणारी संगणक प्रणाली ही दोष विरहीत आहे.

III) संस्थेच्या विद्यमान संचालकांवर यापूर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ किंवा ८८ अन्वये कोणत्याही प्रकरची जबाबदारी निश्चित झालेली नाही.

IV) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १६१ मध्ये नमूद केलेल्या संस्थेच्या कोणत्याही विद्यमान पदाधिकारी/ संचालक/ अधिकारी/ कर्मचारी यांचेवर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही झालेली नाही.

९) संस्थेने यापूर्वी कार्यक्षेत्रवाढ करणेस परवानगी घेतली असल्यास त्याबाबतचे पुरावे प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१०) संस्थेने शासनाच्या कोणत्याही स्वरुपाच्या घेतलेल्या अर्थसहाय्याची पूर्ण परतफेड केली असली पाहिजे.

११) संस्थेचे ठेवी- कर्ज व्याजदराचे धोरण पोटनियमातील तरतूदीशी विसंगत व अवास्तव स्पर्धा करणारे नाहीत याबाबतची खात्री संबंधित निबंधकाने करुन तसे स्वयंस्पष्ट अभिप्राय द्यावयाचे आहेत.

**ड) <u>नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थाचे नवीन शाखेबाबतचे निकष</u> :-**

नवीन नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या शाखा विस्ताराबाबत सुधारित निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | प्रस्तावित शाखा विस्तारासाठी निकष | बृहन्मुंबईसह इतर महानगरपालिका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेसाठी | तालुका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेसाठी | जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेसाठी | विभाग/ शेजारील जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेसाठी | एकापेक्षा अधिक विभाग/राज्यस्तर कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेसाठी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लेखापरिक्षण वर्गवारी | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा | मागील तीन वर्ष **अ** वर्ग असावा | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा | मागील पाच वर्ष **अ** वर्ग असावा |
| २ | ढोबळ अनुत्पादक जिंदगी (Gross NPA) (लगतचे आर्थिक वर्ष) | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी |
| ३ | थकबाकीचे प्रमाण (लगतचे आर्थिक वर्ष) | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी |
| ४ | सी.डी.रेशो (लगतचे आर्थिक वर्ष) | ६० ते ७०% | ६० ते ७०% | ६० ते ७०% | ६० ते ७०% | ६० ते ७०% |
| ५ | स्वनिधी (वसूल भा.भां. +राखीव निधी+ इमारत निधी - संचित तोटे) (लगतचे आर्थिक वर्ष) | २ कोटी ५० लाख | २५ लाख | ८५ लाख | २ कोटी ५० लाख | ३ कोटी ४० लाख |
| ६ | नफा | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी | मागील तीन वर्षे सतत निव्वळ नफयात असावी |
| ७ | निव्वळ नफयाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण (लगतचे आर्थिक वर्ष) | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे | १% पेक्षा जास्त असावे |

तसेच शाखा विस्तार वाढीस सहकार आयुक्त कार्यालयाची पूर्व मंजूरी घेणे बंधनकारक राहील. तसेच असे प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे पूर्व मंजूरीसाठी पाठविणेत येणार असल्याने प्रस्ताव परिपूर्ण व निकषांची पूर्तता करीत असल्याच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पाठवावेत.

१) गाव/ वॉर्ड कार्यक्षेत्र असलेल्या पतसंस्था नवीन शाखांसाठी पात्र असणार नाही. तथापि अशा पतसंस्थांनी त्यांचे कार्यक्षेत्र वाढवून घेतल्यावर (गाव ते तालुका/ वार्ड ते १ किंवा २वॉर्ड कार्यक्षेत्र ) वरील निकष पुर्तता होत असेल तर शाखा विस्तार अशा पतसंस्थांना करता येईल.

२) वरील नमूद १ ते ७ निकष पूर्ततेबाबत वैधानिक लेखापरिक्षकांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३) संस्थेचे चेअरमन यांनी कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोरील खालील मुद्दे समाविष्ठ असलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

I) संस्थेचे सर्व विद्यमान सभासद व ग्राहकासाठी आपला ग्राहक जाणा (KYC) ची १०० % पूर्तता केली आहे.

II) संस्थेच्या मुख्यालयासह सर्व शाखाचे काम संगणकीकृत केलेले असून, कार्यरत असणारी संगणक प्रणाली ही दोष विरहीत आहे.

III) संस्थेच्या विद्यमान संचालकांवर यापूर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ किंवा ८८ अन्वये कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित झालेली नाही.

IV) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १६१ मध्ये नमूद केलेल्या संस्थेच्या कोणत्याही विद्यमान पदाधिकारी/ संचालक/ अधिकारी/ कर्मचारी यांचेवर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही झालेली नाही.

V) संस्थेचे ठेवी- कर्ज व्याजदराचे धोरण पोटनियमातील तरतूदीशी विसंगत व अवास्तव स्पर्धा करणारे नाहीत.

४) संस्थेने यापूर्वी शाखा विस्तारास परवानगी घेतली असल्यास त्याबाबतचे पुरावे प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

५) संस्थेने शासनाच्या कोणत्याही स्वरुपाच्या घेतलेल्या अर्थसहाय्याची पूर्ण परतफेड केली असली पाहिजे.

६) शाखा विस्तार मंजुरीनंतर त्याची वैधता एक वर्षापर्यंतच राहील. संस्थेने मुदतवाढीची मागणी केल्यास जास्तीत जास्त तीन महिने मुदतवाढ देण्यात येईल. मुदतवाढीनंतरही मंजूर ठिकाणी शाखा सुरु केली नाही तर सदरची शाखा मंजूरी आपोआप रद्द समजण्यात येईल.

**शाखा विस्ताराबाबत निकष पूर्तता अटीवर मान्यता असली तरी संस्थेच्या सरासरी ठेव व्याप्तीनुसार एकूण शाखांची महत्तम संख्या पुढीलप्रमाणे निर्धारीत करणेत येत आहे.**

| अ. क्र. | लगतचे आर्थिक वर्षअखेर सरासरी ठेवी | कमाल शाखा मर्यादा (संख्या) |
|---|---|---|
| १) | रुपये ५ ते १० कोटी पर्यंत | ५ पेक्षा जास्त नाही |
| २) | रुपये १० कोटीपेक्षा जास्त ते २५ कोटी पर्यंत | १२ पेक्षा जास्त नाही |
| ३) | रुपये २५ कोटीपेक्षा जास्त ते ५० कोटी पर्यंत | १८ पेक्षा जास्त नाही |
| ४) | रुपये ५० कोटीपेक्षा जास्त ते ७५ कोटी पर्यंत | २५ पेक्षा जास्त नाही |
| ५) | रुपये ७५ कोटीपेक्षा जास्त ते १०० कोटी पर्यंत | ३० पेक्षा जास्त नाही |
| ६) | रुपये १०० कोटीपेक्षा जास्त ते ५०० कोटी पर्यंत | ४० पेक्षा जास्त नाही |
| ७) | रुपये ५०० कोटीपेक्षा जास्त ते १००० कोटी पर्यंत | ६० पेक्षा जास्त नाही |
| ८) | रुपये १००० कोटीपेक्षा जास्त | ८० पेक्षा जास्त नाही |

तथापि रुपये ५०० कोटीपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या संस्थांच्या बाबतीत सदर संस्थेमध्ये वेळोवेळी होणारी ठेवीमधील वाढ, निधीतील वाढ, नफा तसेच संस्थेची आर्थिक स्थिती पाहून मा.सहकार आयुक्त यांना शाखा विस्ताराबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार राहील.

**इ) विलिनीकरण करुन घेतलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या शाखांबाबत :-**

मागील काही वर्षांमध्ये अनके नागरी सहकारी पतसंस्था विविध कारणांमुळे आर्थिक अडचणीत आल्या आहेत किंवा ज्यांचे व्यवहार पूर्णपणे बंद अवस्थेत आहेत किंवा नजीकच्या भविष्यकाळात सदर पतसंस्था अडचणीत येण्याची शक्यता आहे, अशा पतसंस्था विलिनीकरण करुन घेण्याबाबत सक्षम नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी पुढाकार घ्यावा या दृष्टीने शासन स्तरावर विशेष प्रयत्न केले गेले आहेत. अशा बंद नागरी/ग्रामीण बिगर सहकारी पतसंस्था सक्षम नागरी/ग्रामीण बिगर सहकारी पतसंस्थेत विलिनीकरण होण्याच्या दृष्टीने विलीनीकरण करुन घेणाऱ्या पतसंस्थेस काही सवलती देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन व निबंधकाची खात्री करुन अशा पतसंस्था खालील प्रोत्साहनपर सवलतीस पात्र राहतील.

१) शाखा विस्ताराचे निकष कोणतेही असले तरी विलिनीकरण झालेल्या अडचणीतील पतसंस्थेच्या विलिनीकरणाच्या वेळी असणाऱ्या शाखा व्यतिरिकत एक जादा शाखा विलिनीकरण करुन घेतलेल्या पतसंस्थेस घेता येईल,अशा विलिनीकरणाने प्राप्त झालेल्या शाखांचे स्थलांतर विलिनीकरण करुन घेतलेल्या संस्थेस सहकार आयुक्त कार्यालयाचे परवानगीने करता येईल.

२) विलिनीकरण करुन घेतलेल्या संस्थेस विलीनीकरणाच्या नंतरचे लगतचे आर्थिक वर्षापासून पुढील सलग पाच वर्षासाठी लेखापरिक्षणाचे वेटेज ॲव्हेरेज गुणांमध्ये खालील प्रमाणे प्रति वर्ष जादा गुण मिळण्यास ती संस्था पात्र राहील.

प्रथम वर्ष - ५ गुण
द्वितीय वर्ष - ४ गुण
तितीय वर्ष - ३ गुण
चौथे वर्ष - २ गुण
पाचवे वर्ष - १ गुण

३) विलिनीकरणामुळे सदर संस्थेस येणारी तोटयाची रक्कम (Acquisition Cost) विलिनीकरणानंतर सलगचे पाच वर्षात प्रतिवर्षी २०% प्रमाणे समायोजित करता येईल.

४) राज्य शासनाने निश्चित केलेल्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी अशा संस्था विशेष बाब म्हणून ३ गुणास पात्र राहतील. (नजिकच्या वर्षासाठी)

**ई) <u>नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थाच्या शाखा स्थलांतराबाबत निकष</u> :-**

**१) <u>तोटयातील शाखा स्थलांतराबाबत</u> :-**

ज्या नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची शाखा सतत २ वर्षे जी तोटयात आहे, अशी शाखा संस्थेच्या कार्यक्षेत्रात स्थलांतरीत करता येईल. पतसंस्था स्थलांतराबाबत पतसंस्थेने निबंधकाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून सदर प्रस्तावामध्ये पुढील गोष्टीचा समावेश असणे आवश्यक आहे.

१. शाखा परवानगीबाबत निबंधकाने दिलेल्या पत्राची प्रमाणित केलेली छायांकित प्रत.
२. शाखा तोटयात असल्याची कारणे.
३. तोटयातून बाहेर पडण्यासाठी पतसंस्थेने केलेले प्रयत्न.

४. ज्या ठिकाणी शाखा स्थलांतरीत करणार आहे, तेथील पुढील ३ वर्षाची व्यवसाय वाढीबाबतची योजना.

५. तोटयातील शाखा स्थलांतरीत केल्यानंतर सलग तीन वर्षे तोटयात राहिल्यास सदर शाखा बंद करणेबाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे.

**२) <u>तोटयातील शाखा बंद करण्याबाबत</u> :-**

ज्या नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची शाखा सतत ३ वर्षे शाखा तोटयात आहे, अशी शाखा संबंधीत पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बंद करण्याबाबत निर्णय घेणे बंधनकारक राहील.

१) संस्थेची शाखा बंद करताना सदरचे व्यवहार हे जवळच्या शाखेत वर्ग करण्यात यावे.

२) शाखा बंद करताना तेथील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत पर्यायी व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात यावी.

या परिपत्रकान्वये नवीन पतसंस्था नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ, नवीन शाखाविस्तार याबाबतच्या निकषाचे संबंधीत निबंधकांनी काटेकोरपणे पालन करावयाचे आहे.

तसेच या कार्यालयाकडून यापूर्वी निर्गमित केलेली पतसंस्था नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व नवीन शाखाविस्ताराबाबतची सर्व परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत.

**(सतीश सोनी)**
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**